चंद्रपूर शहरातील दुर्गोत्सव मंडळांच्या विनंतीची आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून तातडीने दखल; २२ ऑक्टोबरच्या विसर्जनाबाबत सकारात्मक निर्णय

पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांची भेट घेऊन विसर्जनासाठी आ.मुनगंटीवार यांनी केली आग्रही मागणी; मंडळांना मिळाला दिलासा

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विसर्जनाच्या तारखेबाबत निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी आ.मुनगंटीवार यांचा पुढाकार

चंद्रपूर : चंद्रपूर शहरातील दुर्गोत्सव व शारदोत्सव मंडळांनी यंदा देवीच्या विसर्जन मिरवणुका २२ ऑक्टोबर २०२६ रोजी काढण्याचे नियोजन केले होते. त्यानुसार मंडळांनी महाप्रसाद, मिरवणुकीसाठी वाहने, ढोल-ताशे यांसह विविध व्यवस्थाही आधीच निश्चित केल्या होत्या. मात्र, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून २१ ऑक्टोबर रोजी विसर्जन करण्याची सूचना मिळाल्याने मंडळांसमोर अडचण निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर मंडळांच्या प्रतिनिधींनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे आपली अडचण मांडली. या विनंतीची तातडीने दखल घेत आमदार मुनगंटीवार यांनी पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपानी यांची भेट घेऊन २२ ऑक्टोबर रोजीच विसर्जन मिरवणुका काढण्यास परवानगी देण्याची आग्रही मागणी केली. त्यांच्या मागणीवर पोलीस अधीक्षकांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने चंद्रपूर शहरातील दुर्गोत्सव व शारदोत्सव मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे.

चंद्रपूर शहरात नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. दसऱ्यानंतर बहुतांश दुर्गा व शारदा देवींचे विसर्जन केले जाते. यानुसार शहरातील अनेक दुर्गोत्सव मंडळांनी २२ ऑक्टोबर २०२६ रोजी विसर्जन मिरवणूक काढण्याचे नियोजन केले होते. मिरवणुकीपूर्वीचा महाप्रसाद, मिरवणुकीसाठी आवश्यक वाहने, ढोल-ताशांची व्यवस्था यांसह विविध बाबींचे नियोजन मंडळांनी आधीच केले होते. त्यासाठी आवश्यक अग्रीम रक्कमही संबंधितांना देण्यात आली होती. मात्र, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाकडून २१ ऑक्टोबर रोजी विसर्जन करण्याबाबत सूचना मिळाल्याने मंडळांसमोर अडचण निर्माण झाली होती. नियोजनात अचानक बदल करावा लागल्यास आर्थिक नुकसान होण्यासोबतच धार्मिक कार्यक्रमांच्या व्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता होती. त्यामुळे २२ ऑक्टोबर रोजीच विसर्जन मिरवणूक काढण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती मंडळांच्या प्रतिनिधींनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली.

मंडळांच्या या विनंतीची तातडीने दखल घेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांची भेट घेऊन मंडळांची भूमिका मांडली. आधीच झालेले नियोजन आणि धार्मिक कार्यक्रमांचे महत्त्व लक्षात घेता २२ ऑक्टोबर रोजी विसर्जन मिरवणुकीस परवानगी देण्याची आ.मुनगंटीवार यांनी आग्रही मागणी केली. या मागणीवर पोलीस अधीक्षकांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, त्यामुळे दुर्गोत्सव व शारदोत्सव मंडळांना दिलासा मिळाला आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दुर्गोत्सव व शारदोत्सव मंडळांच्या अडचणींची तातडीने दखल घेत प्रशासनाकडे त्यांच्या मागणीची ठामपणे बाजू मांडली. त्यांच्या पुढाकारामुळे विसर्जनाच्या तारखेबाबत निर्माण झालेला पेच दूर होण्यास मदत झाली असून, चंद्रपूर शहरातील मंडळांना आपल्या पूर्वनियोजित धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करता येणार आहे. मंडळांच्या विनंतीला तत्परतेने प्रतिसाद देत त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याप्रती चंद्रपूर शहरातील दुर्गोत्सव व शारदोत्सव मंडळांकडून कृतज्ञतेची भावना व्यक्त होत आहे.